स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५०५५

ॐ

श्रीनारायणायनमः

# श्रीनारायणस्तुति



अभंग

नकळे महिमा वेद मौनावले। जेथ पांगुळलें मन पवन॥
चंद्र सूर्य ज्याचें तेज वागविती। तेथ माझी मती कोणीकडे॥
काय म्या वानावे तुझ्या थोरपणा। सहस्रवदना वर्णवेना॥
तुका म्हणे आम्हीं बाळें तूं माउली। कृपेची साउली करी देवा

—तुकाराम.

विष्णू रामचंद्र दुखंडे.

REFBK-0000226
REFBK-0000226

किंमत २ आणे

चिटणीस मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
यांस सप्रेम भेट.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थळ प्रत
सं. क्रमांक ७०९
ता. ११/७/३५

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७०२३

REFBK-0000226

REFBK-0000226

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २२६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

ॐ तत् सत्

## श्रीसद्गुरुनाथ श्रीनारायणमहाराज

॥ परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम् ॥



॥ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ८-१४. ॥

आर्या:- अत्रि मुनी अनुसूया उदरीं हे दत्तरूप अवतरले॥
श्रीनारायण नटले, आतां नामेंचि भक्त बहु तरले.॥१॥ विष्णुदास.

इन्डीअन आर्ट प्रि. प्रेस, मुंबई, २.

# अर्पण-पत्रिका

या
दृश्य अदृश्य
जगतांत ज्ञानगोचर
होणाऱ्या प्रत्येक वस्तूचें
उत्पत्ति स्थिति आणि लय
हीं ज्याच्या इच्छेनें घडत
असतात, अनेक अवतार धारण
करून भक्ताभक्तांचा प्रतिपाळ करून,
युगायुगाचे ठायीं जो सद्भक्तिचा प्रसार
करितो आणि ज्याच्या पावन नामस्मरणानें
महापापीही उद्धरून जातात, त्या श्रीदत्ता-
वतारी श्रीमत् अनंतकोटी ब्रह्मांडनायक महाराजा-
धिराज भू-वैकुंठ बेट निवासी सच्चिदानंद समर्थ

**श्री सद्गुरुनाथ नारायण महाराज**

यांच्या पवित्र चरणकमलीं त्यांच्याच
कृपानुग्रहानें लिहिली गेलेली ही
अल्पस्तुति भक्तिभावाच्या
प्रेमातिशयानें आणि
अत्यंत आदरानें हा
नम्र दास सम-
र्पण करीत
आहे.

मुद्रक
एस्. व्ही. परुळेकर,
मुंबईवैभव प्रेस, सँडहर्स्टरोड,
गिरगांव, मुंबई नं. ४.

सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.

प्रकाशकः—
विष्णू रामचंद्र दुखंडे,
घर नं. २२ तिसरा पारशीवाडा,
गिरगांव मुंबई नं. ४

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

# प्रस्तावना.

**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवीती उपकारें ॥**

श्रीयुत रा. रा. **विष्णू रामचंद्र दुखंडे** राहणार मुंबई यांचा माझा गेल्या सालींच परिचय झाला. त्यांची **श्रीसद्गुरु नारायण महाराज सं. बेट** यांचेवर परमावधीची भक्ति व प्रेम आहे. त्यांनीं **श्रीनारायणस्तुति** हें पुस्तक तयार केलें आहे. त्यांनीं बेटांतील निरनिराळ्या उत्सवास व सणास हजर राहून त्या त्या प्रसंगाचें वर्णन फारच बहारीचें केलें आहे. त्यांना पद्यात्मक ग्रंथ लिहीण्याची बरीच संवय दिसते, त्यांचें अंतःकरण श्रीसद्गुरूंचें चरणीं लीन आहे असें त्यांचें कवनावरून स्पष्ट दिसतें. त्यांचें अंतःकरण भक्तिरसानें ओथंबलेलें आहे व **श्रीसद्गुरु नारायण महाराज** हे देवाचा अवतार आहेत असें त्यांनीं केलेल्या कवनावरून दिसून येतें. त्यांनीं भूपाळी, नमस्कार दशक, मनास उपदेश, करुणापंचक, खरा नातेवाईक वगैरे निरनिराळीं कवनें करून त्यांना होत असलेल्या स्वानंदसुखाचा लाभ सर्वांस करून दिला आहे. श्रीसद्गुरुकृपेशिवाय या गोष्टी होऊं शकत नाहींत. या स्तुतींत भक्तिमान् पुरुषाचें अंतःकरण भक्तिरसानें प्रफुल्ल होऊन गहिंवरल्याशिवाय रहात नाहीं. प्रत्येक कवन हृदय हालवून सोडतें. त्यांनीं स्तुतीमध्यें **‘ हें बेट कसें आहे ’** या पदांत बेट हें वैकुंठ आहे असें दाखविलें आहे, परंतु वैकुंठांत ज्या गोष्टी दुर्मिळ त्या श्रीसद्‌गुरूंचें दर्शनानें व बेटांत निवास केल्यानें आपणास प्राप्त होतात व सौख्याचा लाभ होतो असें आत्मानुभवानें सांगितलें आहे. स्तुतीमध्यें श्रीगुरुपौर्णिमेचे उत्सवाचें दिवशींचें श्रीसद्गुरूंचें दर्शन, शके १८५४ चे कार्तिकी पौर्णिमेचे दिवशीं श्रीसद्गुरू नारायण महाराज यांनीं केलेली श्रीसत्यनारायणाची अवर्णनीय महापूजा, रंगपंचमीचे दिवशींचा रंगाचा थाट वगैरे उत्सवांचीं वर्णनें वाचली असतां प्रत्येक उत्सवप्रसंग डोळ्यांपुढें सारखा उभा राहतो. एकंदरींत **श्रीनारायणस्तुति** हा ग्रंथ अत्यंत मननीय, वाचनीय व भक्तिरसप्रधान असा झालेला आहे.

**श्रीसमर्थसद्गुरू नारायण महाराज** यांचें वास्तव्य पुणें जिल्ह्यांत केडगांवनजीक **श्रीक्षेत्र बेट** येथें बरेच वर्षांपासून आहे. त्यांचें दर्शनसुखाचा ज्यांस लाभ होतो ते तापत्रयांतून मुक्त झाल्याशिवाय रहात नाहींत. श्रींची कीर्ति अखिल भरतखंडांत पसरली

आहे. भरतखंडांतील निरनिराळ्या प्रांतांतून उदाहरणार्थ, बंगाल, पंजाब, वायव्यप्रांत, गुजराथ, वऱ्हाड, कर्नाटक, मद्रास, म्हैसूर, ग्वाल्हेर, द. हैद्राबाद वगैरे प्रांतांतून हजारों भक्तजन येऊन श्रींचें दर्शन घेऊन पुनीत होतात. '**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति**' या उक्तींप्रमाणें श्रीसद्गुरूनाथ रात्रंदिवस आपले भक्तजनांचें कल्याणाकरितां आपला अमूल्य वेळ खर्च करून प्रेमानें व आपलेपणानें त्यांना वारंवार उपदेश करून त्यांचा उद्धार करतात. आबालवृद्धाकडे व गरीबापासून श्रीमंतापर्यंत श्रींची दृष्टी सारखी असते. जो जो मनुष्य त्यांचें दर्शनास जातो त्या प्रत्येकाचें अत्यंत बारकाईनें निरीक्षण करून त्याच्या अडचणी व यातना दूर करतात. आपण बेटांत असतांना आपणांस घरच्या विवंचनांचा व गोष्टींचा कांहीं काळ विसर पडतो. प्रत्येकानें देवाचें नामस्मरण करून आनंदांत असावें अशी त्यांची फार इच्छा असल्याकारणानें व प्रत्येकास भजनानंदाची गोडी उत्पन्न व्हावी म्हणून चातुर्मासांत अहोरात्र व्यवस्थितपणें नामस्मरण करून घेतात. तेथें येणाऱ्या प्रत्येकास स्नानाची व भोजनाची तयारी करण्यांत वेळ जाऊं नये म्हणून व तो वेळ भजनानंदांत घालवावा म्हणून श्रींनी स्नानभोजनाची उत्तम व्यवस्था करून ठेविली आहे. याशिवाय भजनें व कीर्तनें नेहमीं चालू असतातच. आपण कसें वागावें व आपल्या आयुष्याचा काळ कसा घालवावा याबद्दल उपदेशाच्या गोष्टी सांगून प्रत्येक भक्ताची **श्री** सुधारणा करीत असतात व प्रत्येकास आपले आचरणानें धडा घालून देतात.

**श्रीं**ची स्वारी नित्यनेमानें अरुणोदयापूर्वी शौचमुखमार्जनादि विधी उरकून स्नान करून सूर्योदयापूर्वीं संध्यावंदन करतात. सूर्योदयापूर्वीं अर्घ्यदानाचा नियम ते कधींच चुकूं देत नाहींत. पुढें देवपूजा व नित्यनियमाची इतर कृत्यें उरकून श्रींची स्वारी श्रीदत्तमंदिरांतील **श्रीदत्तमहाराजांचें** दर्शनास जाते व देवदर्शन घेऊन परत आपल्या निवासस्थानीं येऊन भक्तजनांचा उद्धार व्हावा या हेतूनें भक्तजनांस दर्शन देत बसते. त्यानंतर भोजनादि विधी उरकून पुनः भक्तजनांस पुनीत करण्याकरितां दर्शनसुखाचा लाभ **श्रीसद्गुरु** देतात. त्यानंतर कांहीं तास विश्रांती घेऊन श्रींची स्वारी सायंकाळीं सूर्यास्तापूर्वी संध्यावंदनादि कृत्यें उरकून **श्रीदत्तमहाराजांचें** भक्तांसमवेत पुनः दर्शन घेऊन भक्तजनांसह भजनकीर्तनांत वेळ घालविते. त्यानंतर अल्पोपहार करून भक्तांना उपदेश करून त्यांचीं मनें शुद्ध करितात. अशा रीतीनें मनुष्यानें धर्माचरणानें कसें वागावें हें श्री स्वतः आचरण करून धडा घालून देतात.

चातुर्मासांत दर पौर्णिमेस **श्रींचा श्रीसत्यनारायणाची पूजा** करण्याचा नियम आहे व हा नियम १कत्येक वर्षे चालू आहे. अशी **श्रीसत्यनारायणपूजा** बेटाशिवाय दुसरे कोठेंही पहावयास मिळणें शक्य नाहीं. सायंकाळीं **श्रीसत्यनारायणपूजेस** आरंभ होतो, व पूजेचे सुरवातीपासून अखेरपर्यंत ३।४ तास वेळ लागतो. त्या पूजेचा थाट काय विचारावा ! **श्रीसत्यनारायणाची** मूर्ती अष्टभुजा असून, सुवर्णाची केलेली आहे. त्या मूर्तीचें श्री स्वहस्तें पूजन करितात. **श्रीसत्यनारायणपूजेचे** वेळीं रुद्राभिषेक होत असतो. विष्णुसहस्रनामानें **श्रीसत्यनारायणास श्री** लाखोंच काय परंतु कोट्यावधी तुळशीदलें अर्पण करतात. सदर पूजन चालू असतां भजनकीर्तनादि नामस्मरणें चालू असतात. **श्रीसत्यनारायण**पूजेनंतर **श्री** स्वहस्तें भक्तजनांस तीर्थ देऊन पुनीत करतात व प्रसाद इतराकरवीं वाटतात.

श्रीक्षेत्र बेट येथें **श्रीसत्यनारायणपूजेचे** दोन सप्ताह करण्यांत आले होते, त्या सप्ताहाचें वर्णन तर अवर्णनीयच आहे. दर तासास निराळी पूजा अशा अहोरात्र मिळून २४ पूजा दररोज होत असत; व **श्रीसत्यनारायणाची** सर्व पूजा, अभिषेकतुळशीनामावळीसह एक तासांत आटपण्याजोगी केली होती. प्रत्येक तासास पूजा सांगणारे, करणारे व नामस्मरण करणारे अशी सहा माणसें निरनिराळीं होतीं. अहोरात्र " **श्रीनारायण जय नारायण जय जय नारायण नारायण** " असा घोष चालू होता. अशा रीतीनें सात दिवस पूजा होऊन आठवे दिवशीं सायंकाळपर्यंत पूजा होत असत व सायंकाळीं श्रींचें हस्तें **महापूजा** होत असत.

एकदां **श्रीसत्यनारायणाच्या १०८ पूजा** एकाच वेळीं करण्यांत आल्या होत्या, व १०८ भक्तजनांनीं श्रीबरोबर एकाच वेळीं **श्रीसत्यनारायणपूजा केल्या.** प्रत्येक पूजेचा थाट एकसारखा होता व या पूजेकरितां १०८ शालिग्राममूर्ती मुद्दाम आणल्या होत्या. त्यानंतर गेल्यासालीं कार्तिकी पौर्णिमेस **श्रीसत्यनारायणाचे** पूजेचा समारंभ करण्यांत आला होता त्याचें **रा. दुखंडे** यांनीं यथार्थ वर्णन केलें आहे. तो समारंभ पहाण्याचा ज्यांस लाभ मिळाला असेल ते खरोखरच धन्य होत. त्या महापूजेचा आरंभ **श्रींनीं** भजनमंदिराचे पायरीवर बसून केला व १८।२० फूट उंचीवरून श्रींनीं तुळशी फुलें व कमळें अर्पण केलीं. त्यावेळीं १ लाखाहून जास्त कमळें, १०० पोतीं तुळशी व अदमासें ३०० करंड्या फुलें पुजेकरितां महाराष्ट्रांतील निरानिराळ्या भागांतून आणण्यांत आलीं होतीं. तो पूर्वी कोणी पाहिला नसेल व

पुढेंहि पहावयास मिळणार नाही. हे समारंभ पाहिल्यानें **‘अघटित तेहि घडुनि आणिती’** या वचनाची बरोबर साक्ष पटते.

कोणत्याही वृत्तीचा मनुष्य तेथें गेला असतां तो श्रीसद्‌गुरूंचे चरणीं लीनच होतो व श्रीसद्गुरूंची सेवा केल्यानें त्याचा उद्धार होतो. **“श्रीसद्गुरु त्रिविध जन बोधुनि हित करिती”** या वचनाची प्रचीति त्या स्थळीं गेल्यानें दिसून येते.

श्रींचें चरित्रवर्णनाची ही जागा नव्हे त्याचा एक निराळा ग्रंथ होईल. श्रींचें दर्शनानें काय काय लाभ होतात यांचा **रा. दुखंडे** यांस अनुभव आहेच, व त्याचें यथातथ्य वर्णन त्यांनीं निरनिराळ्या कवनांत केलें आहे. त्यामुळें **“श्रीनारायणस्तुति”** हा ग्रंथ संग्राह्य झालेला आहे. या ग्रंथाचा भक्तजन फायदा घेतील असा भरंवसा वाटतो. अशा रीतीनें **श्रीसद्गुरुवर्णन** करून ही प्रस्तावना पुरी करितों.

**येवलें**
मिती श्रावण शु॥ १५
शके १८५५
ता. ५-८-१९३३

श्री सद्‌गुरूंचे चरणीं विलीन असलेला सेवक,
**सदाशिव अण्णाजी जोशी, वकील.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
दि. ........

ॐ

# आत्मनिवेदन.

**अनेक जन्मीं दुष्कृत केलें दुर्बुद्धितें वरिलें ॥**
**म्हणोनि माझें आजवरीं तें व्यर्थचि आयुष्य गेलें ॥**
**परंतु किंचित सुकृत होतें दर्शन अपुलें झालें ॥**

श्रीसद्गुरू प्रार्थनेच्या उपरीनिर्दिष्ट दोन ओळींत म्हटल्याप्रमाणें, अनेक जन्मांतील नाना तऱ्हेच्या दुष्कृत्त्यांचें गांठोडें बरोबर घेऊन, ज्याच्या योगानें जीवाला सच्चिदानंद पदवी प्राप्त होतें, असा हा दुर्लभ नरदेह प्राप्त झाल्यावर देखील, त्याच दुष्कृत्त्यांचे धडे गिरविण्यास सुरुवात केली; ती इतकी, कीं माझ्यासारख्या पातकी जीवाची व्यवस्था लाविण्यास, यमराजानां निराळ्या कुंडांची तयारी करावी लागली असती असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं; कारण तशाच अक्षम्य पातकाच्या राशींत एखाद्या श्वानाप्रमाणें हा जीव लोळत होता. परंतु वरील ३ ऱ्या ओळींत म्हटल्याप्रमाणें, कांहींतरी पुण्यांश होता म्हणूनच सोमवार ता. २१ मे १९२८ रोजीं हरिकीर्तनांत **श्रीगुरुभक्त बनुबाई बाळकृष्ण शिंदे** यांचें दर्शन झालें. तेव्हांपासून तों आज मिति पावेतों **श्री. बनुबाई** निरपेक्षबुद्धीनें आपल्या सहवासाचा निरंतर लाभ देऊन, माझें मलीन झालेलें आयुष्यरूपी वस्त्र स्वच्छ करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ( ईश्वरभक्ति बरोबरच प्रत्येक वस्तु निर्मळ ठेवण्यांत त्यांचा हातखंडा आहे. स्वच्छता आणि टापटीप हा त्यांच्या अनेक सद्गुणापैकीं एक मोठा प्रशंसनीय सद्गुण आहे. )

**श्रीगुरुभक्त बनुबाईचा** सत्संग जर मला लाभला नसता, तर माझी आयुष्यरूपी नौका, चैनी विषयोपभोगरूपीं महासागरांत सांपडून, त्याला कुसंगतीचे वादळाची जोड मिळून, नानातऱ्हेच्या व्यसनरूपीं खडकावर आपटून, अपकीर्तिच्या रसातळास केव्हांच गेली असती. परंतु सद्गुरुदेवांचे कृपेनें, ऐनप्रसंगांतच त्यांची व माझी भेट होऊन, त्यांनी मला हा नंदनवनाचा मार्ग दाखविला, नव्हे मला हातांशीं धरून मोक्षमार्गाकडे घेऊन जाण्यास तयार झाल्या. श्रीसद्गुरुनाथांचें दर्शन व त्यांच्या कृपानुग्रहाचा लाभ त्यांनींच करून दिला आणि त्याच अमूल्य संगतीचें "**श्रीनारायण स्तुति**" हें पहिलें पुष्प आहे.

वास्तविक **श्रीगुरुभक्त बनुबाईंचा** चरित्रभाग लिहिण्याची किंवा त्यांची स्तुति करण्याची ही जागा नव्हे; ( त्याचा भगिनीवर्गास आदर्श असा एक ग्रंथ होईल ) परंतु श्रीगुरुभक्त बनुबाईंची सत्संगती जर मला लाभली नसती तर प्रस्तुत "**स्तुति**" व इतर कांहीं आख्यानें माझ्यासारख्या मूढाकडून याच जन्मीं नव्हे, परंतु कोणत्याच जन्मीं लिहिणें झालें नसतें; एवढेंच मला सांगावयाचें आहे. माझ्या-सारखें, बऱ्याचशा दुर्व्यसनी स्त्री पुरुषांना, त्यांनीं सन्मार्गाला लाविल्याची उदाहरणें अद्याप जिवंत आहेत.

सारांश स्तुतिमध्यें जें कांहीं लिहिलें गेलें आहे, ती सद्गुरुस्तुति, **श्रीगुरुभक्त बनुबाईनींच**, परंतु माझें निमित्त करून लिहिली आहे. माझें निमित्त असल्यामुळें काव्यरचनेंतील दोष माझ्यावरच राहाणार. त्याबद्दल कोणीही लिहून कळविल्यास आणि "स्तुतिची" पुनारावृत्ती छापण्याचें भाग्य लाभल्यास त्यांतील चुकांची दुरुस्ती अवश्य केली जाईल. आतां स्तुतिच्या अंतरंगाकडे वळूं.

**भूवैकुंठ बेटांत** ज्या ज्या वेळीं मुकाम करून, श्रीगुरुदेवांचे चरणकमलांच्या सहवासाचें भाग्य मला लाभत होतें, त्या त्या वेळीं तेथील उत्सवाचा आनंद, स्वर्ग-तुल्य शोभा, भक्तांचा जमाव, भोळ्या भक्तांची भाविक भक्ति वगैरे गोष्टी पाहून माझ्या मस्तकांत कांहींतरी काव्यकल्पना घोळत असत, मात्र काव्य कशावर व कसें करावें हें कांहीं सुचत नव्हतें. याच विचारांत माझें मस्तक रात्रंदिवस भ्रमण करीत असतां कार्तिक पौर्णिमेची अवर्णनीय महापूजा पाहून आल्याबरोबर, पूर्वीच्या सर्व कल्पना मूर्तस्वरूपांत येऊं लागल्या. पौर्णिमेचें वर्णन रचून इतर गुरुभक्त मंडळींनां दाखविलें, व त्यांनीं पुढील सर्व काव्यास प्रोत्साहन दिल्यामुळें व सद्गुरु-माऊलींचे कृपानुग्रहामुळें थोड्याच अवधींत इतर सर्व पद्यें रचलीं गेलीं, रंगपंचमीचे उत्सवांत हीं पद्यें महाराजानां वाचून दाखविण्याचा सुयोग लाभला. **श्रींनीं** सर्व पद्यें श्रवण करून आशिर्वाद दिला व छापून प्रसिद्ध करण्यास आज्ञा दिली. त्याच उत्सवांत पंचमीचीं पद्यें रचलीं गेलीं तीही यांत गोंविली आहेत.

वास्तविक मला काव्यरचनेची किंवा संगिताची मुळींच माहिती नाहीं, परंतु "**स्तुति**" हें फक्त सद्गुरुदेवांचे कृपाप्रसादाचें फल आहे. एखादें अज्ञान मूल, आपल्या आई बरोबर आपऱ्या वेड्या वांकड्या शब्दांत बोलत असतें; त्याचप्रमाणें गुरुदेवांची स्तुति स्वशब्दरचनेनें करावी असें बरेच दिवस वाटत होतें. ती इच्छा माऊलींनीं पूर्ण केली. ती "**स्तुति**" आज **श्रीगुरुपौर्णिमेचे सुवर्णदिनीं सद्गुरुमातेचे पवित्र चरणीं अर्पण करण्याचें भाग्य मला लाभलें** या

२२६
दा. क्र.



बद्दल माझा आनंद गगनांत मावेनासा झाला आहे. तेव्हां या वेड्या वांकड्या **"स्तुतिचा"** गुरुभक्त मंडळींनीं हंसक्षीरन्यायानें उपयोग करावा हीच प्रार्थना आहे.

जगांतील अतिशय थोर अशा भाग्याचा संचय जवळ बाळगून राहाणारे, **श्री. रा. रा. सदाशिव अण्णाजी जोशी** वकील मु. येवलें यांनीं वेळोवेळीं पित्याप्रमाणें प्रोत्साहन देऊन कामाची घाई असतांनांसुद्धां आपला अमूल्य वेळ खर्च करून या चिमुकल्या पुस्तकाला उत्तम प्रस्तावना लिहून दिली, याबद्दल मी त्यांचा अंतः-करणपूर्वक फार आभारी आहे; आणि अशाच गुरुभक्तांच्या चरणधुळीचें सान्निध्य मला जन्मोजन्मीं लाभो अशी मी देवाजवळ प्रार्थना करितों.

त्याचप्रमाणें श्रीगुरुमाऊलीच्या २४--२५ वर्षांपूर्वींच्या कथा सांगून, त्या अमृत रसाचें आम्हांकडून वेळोवेळीं पान करविण्याची अमूल्य संधि या दासास दिल्याबद्दल, महाराजांच्या परमप्रिय श्रीगुरुभक्त **अंजनीताईसाहेब** यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

श्रीगुरुपौर्णिमापूजासमारंभाचें छायाचित्र छापून दिल्याबद्दल **श्रीगुरुभक्त बाळकृष्ण पांडुरंग ठकार** यांचेही मी अत्यंत मनःपूर्वक आभार मानितों.

अल्पावधी म्हणून फार मेहनत घेऊन सुबक रितीनें **"स्तुति"** छापून दिल्याबद्दल, मुंबईवैभव प्रेसचे व्यवस्थापक रा. रा. **भास्कर महादेव सिद्धये** आणि छापखान्यांतील **कामगार मंडळी** यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

त्याचप्रमाणें **श्रींचे भक्त रा. रा. गणपतराव बाबूराव पाटकर** यांनीं श्रींच्या प्रेरणेनें मला वेळोवेळीं, सदरहू काव्यरचनेंत आणि पुस्तक प्रसिद्धीकरणांत निर-निराळ्या उपसूचना केल्याबद्दल त्यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे.

श्रीसद्गुरुनाथांच्या अनेक विद्वान भक्तांनीं केलेल्या स्तुति स्तवनांकडे पाहतां प्रस्तुत **" स्तुति "** म्हणजे कांहींच नाहीं, तरीपण सर्वच बालकांचा मातेवर समान हक्क असतो याच एका आधारावर श्रीगुरुचरणारविंदीं तुकोबारायांचे अभंग चरणानें हें निवेदन पुरें करितों.

**तुका म्हणे आम्हीं बाळें तूं माउली । कृपेची साउली करी देवा ॥**

श्रीगुरुपौर्णिमा
( भाद्रपद १८५५ )
सोमवार ता. ४।९।३३

**विष्णू रामचंद्र दुखंडे.**

# वैकुंठींचा देव


श्रीगुरुपौर्णिमेचे दिवशीं दरबाराच्या दरवाज्यांतून देवाचें दर्शन घेत असतां, हृदयसागरांत आनंदाच्या ज्या लहरी उसळल्या त्याच, ( जशाच्या तशा नाहीं ) शब्दरुपानें खालीं लिहिलेल्या आहेत.

## भाद्रपद शु. पौर्णिमा शके १८५४.

**पद.** ( चालः–सबसे राम भजन. )

जगिं या भक्ति सुलभ करण्यास्तव, आला वैकुंठींचा देव ॥
आला वैकुंठींचा देव ॥ ध्रु० ॥
निर्गुणरूपीं वास जयाचा निजानंदि जो सदा रमे ॥
नर-तनु भक्तांसाठिं धरी जो, नारायण नामें ॥ आला ॥ १ ॥
रौप्य सिंहासनीं विराजलि सद्गुरुंची स्वारी ॥
भाळीं चंदन त्रिपुंड केशरि, हास्य-वदन सुखकारी ॥ आला ॥२॥
माणिकांचा मुकुट मस्तकीं, रेशमी वस्त्रें जरिकाटी, ॥
उटी सुगंधित अंगिं झळकतो मौक्तिक कंठाकंठीं ॥ आला ॥ ३ ॥
दिव्य तेजमय करीं मुद्रिका पीतांबर कटिं झळके ॥
कोटी मदनाहुनी आगळें रूप, तेज फांके ॥ आला ॥ ४ ॥
चरण-रजाचा स्पर्शचि होतां महापापिही तरले ॥
महाभाग गुरु-चरणां पूजिति; दुर्भागी उरले ॥ आला ॥ ५ ॥
दाटि भोंवती द्विज भक्तांची तशी भाविकांची ॥
वैकुंठीं विष्णूशी शोभा, जशी मुनी सुरऋषिंची ॥ आला ॥ ६ ॥
मूढमती हा विष्णुदास अवगुणी असे, अपराधी ॥
श्रीनारायण वैकुंठींच्या देवा भावें वंदी ॥ आला ॥ ७ ॥

वैकुंठींचा देव



दाटि भोंवती द्विजभक्तांची तशी भाविकांची ।
वैकुंठीं विष्णूशीं शोभा जशी मुनीसुरऋषिंची ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
७०१३
मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्र. ७०१
२२६

# ॥ श्रीनारायणस्तुति ॥

## भूपाळी.

पहांट झाली अरुण उगवला उठा किं भक्तजन, ॥
॥ तुम्हीं हो ॥ उठा किं भक्तजन ॥
रामप्रहरीं भावें करुंया सद्गुरुचें स्मरण ॥ धृ० ॥
ब्रह्मा विष्णू महेश आदी देवाहुनि मोठा ॥
॥ आदी । देवाहुनि मोठा, ॥
सद्गुरु—महिमा त्रैलोकीं हा बोल नसे खोटा ॥ १ ॥
भक्तां पाळुनि, दुष्ट जनांस्तव गदा चक्र घेई ॥
॥ श्रीहरि । गदा चक्र घेई, ॥
माउलि माझी दुष्ट जनांही मोक्षपदा नेई ॥ २ ॥
सांदिपनीच्या पायीं श्रीहरी, राम वशिष्ठातें ॥
॥ श्रीहरि । राम वशिष्ठातें, ॥
वंदिति भावें सद्गुरुमहिमा जगा पटविण्यातें ॥ ३ ॥
त्रैलोक्यातें व्यापुनि प्रभु तो निरंजनीं वसतो ॥
॥ प्रभु तो । निरंजनीं वसतो, ॥
कृपा--बलानें सद्गुरु त्याचें दर्शन करवीतो. ॥ ४ ॥
अनुसूयेच्या व्रता पाहुनि अत्रिमुनीच्या तपा ॥
॥ पाहुनि । अत्रिमुनीच्या तपा ॥
सद्गुरुमूर्ती प्रगट जहाली, धरुनी योगी रुपा ॥ ५ ॥
सुलभ शुद्ध सात्वीक भक्तिला दाविति, दत्तात्रय ।।
॥ बेटीं । दाविति दत्तात्रय ॥
श्रीनारायण नामें कलियुगिं हरिती तापत्रय ॥ ६ ॥

देह-भाव हा ताल धरोनी, जीव-भाव हा सूर तया ॥
॥ देऊं । जीव-भाव हा सूर तया ॥
सद्गुरुस्तवनीं निजआनंदें तरीच सार्थक नर-काया ॥ ७ ॥

श्रीनारायण जय नारायण जयजय नारायण ॥
॥ वदा हो ॥ जयजय नारायण ॥
रामप्रहरीं भावें करुंया सद्गुरुचें स्मरण. ॥ ८ ॥

---

# ॥ नमस्कार दशक ॥

## ॥ नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥

( भु. प्र. वृत्त )

जया बेट, संस्थान नारायणाचें ॥
असे भक्त संबोधिती; नित्य वाचे ॥
जणों स्वर्ग; हा कीं दुजा भूतलाशी ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ १ ॥

नसे भेद ठावा, गरीबा अमीरा ॥
समानत्वरूपें कृपा सान थोरां ॥
करी प्रेम; माता, जशी बाळकाशी ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ २ ॥

गुरू दत्त नामीं सदा डुल्लती, जे ॥
मुखेंदूवरी तेज तैसें विराजे ॥
स्वयें गाउनी नाचती, प्रेमराशी ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ ३ ॥

अहो रम्य, तें दत्त मंदीर मोठें ॥
जया दर्शनीं थोर आनंद दाटे, ॥
मुळीं ठाव जेथें न; तापत्रयाशीं ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ ४ ॥

जिवा जाचिती, क्लेश भारी भवाचे ॥
उणें, दुःख तें त्यापुढें रौरवाचें ॥
पदाब्जा परी सेवितां सर्व नाशी ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ ५ ॥

समस्तांशि आदेशि जो नामघोषा, ॥
कृपाहस्त ठेवी; निवारोनि दोषां ॥
अनन्याशि तारी, जरी पापराशी ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ ६ ॥

कदा प्राप्त ना होत जें ज्ञान भक्तां ॥
जपा तीव्र तैशीं तपें आचरीतां, ॥
पदीं ठेवितां भाव; दे ज्ञानराशी ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ ७ ॥

अहर्नीश जो दावि, सन्मार्ग भक्तां ॥
स्वयें आचरोनीच सद्भक्ति-पंथा, ॥
असे; ज्ञान-भानू स्वयं तेजराशी ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ ८ ॥

चतुर्वीध घेती पदीं भक्त धांवा; ॥
क्षुधार्थी जसा दातयापाशि यावा, ॥
जया भाव जैसा; फलें त्यास तैशी. ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ ९ ॥

नमो दीननाथा कली-तापहर्ता, ॥
समर्था खरा तूंचि तीं-लोकिं कर्ता ॥
विरामो सदा चित्त हें त्वत्पदाशीं ॥
नमस्कार श्रीनाथ नारायणाशी ॥ १० ॥

# हें बेट कसें आहे ?

( पद चा०—एकांत वास हा पसंत )

हें बेट नसे वैकुंठ असे हो साचें ॥ असे हो साचें ॥
जें निवास–स्थल कीं दत्त गुरुरायाचें ॥ ध्रु० ॥
किति पतित पातकी उद्धरुनीयां गेले, ॥
किति दुःखिजनांचें दुःख नष्टची झालें; ॥
किति भक्ति-पंथ तो सुलभ करुनियां घेती; ॥
किती नामघोष गायनीं रंगुनी जाती ॥
(चा० दु०) दुमदुमे; नाम नारायण ज्या स्थळीं ॥
हो श्रेष्ठ जेथिंची श्रीसद्गुरु-पद-धुळी; ॥
दुःखास ठाव ज्या ठायिं नसे मुळीं; ॥
(चा० पू०) किति मूढमती मी वर्णु तया सौख्याला। तया सौख्याला॥
श्रीसद्गुरु-पद-दर्शनीं लाभ दासाला ॥ १ ॥

---

## ॥ कार्तिक पौर्णिमेची श्रीसत्यनारायणाची महापूजा ॥

शके १८५४.

पद ( ता. धुमाळी )

ही कार्तिकाचि पौर्णिमा, जाहली सीमा, आनंद–चंद्रमा उगवला
बेटीं, ॥ गुरु–भक्त–सागरा प्रेम उंचबळे, पोटीं ॥ध्रु०॥
पातले भक्तांचे वृंद, मनीं आनंद, जयातें छंद, नारायणनामीं, ॥
धांवती भोगण्या सौख्य बेटपुर ग्रामीं ॥ १ ॥

पाहतां भास मनिं होत, पंढरी सत्य, यात्रेचा खचित, आषाढि
कार्तिकिचा, ॥ ओढाहि दाखवी, भाव चंद्रभागेचा, ॥ २ ॥
कुणि पुष्पहार गुंफिती, कमळें निवडिति, तुळशि वेंचिती, हर्ष
कार्याचा, ॥ मुखिं घोष चाले, श्रीनारायण नामाचा ॥ ३ ॥
अस्तास जातां नारायण, बसे नारायण पुजण्या नारायण, वालि
सत्याचा ॥ हा योग लाभला, बहूत हो भाग्याचा ॥ ४ ॥
भोंवती द्विजांचे भार, कामामधें चूर, पुजा संभार, घेउनी हातीं; ॥
विधिमंत्र घोष जे वेद मुखानें म्हणती ॥ ५ ॥
हा मधुर नाद वाद्यांचा, समेळ सनईचा, घुमे स्वर साचा, जनां
डोलवितो, ॥ तो भक्त गाउनी रागकला दावीतो. ॥ ६ ॥
सुस्वर भजन जनें करिती, टाळ गर्जती, मृदंग वाजती, राग ते
नाना, ॥ गाउनी हर्षवीताति जनांच्या मना ॥ ७ ॥
होतसे भक्तांची दाटी, जशी वाळवंटि, भीमेच्या कांठिं, पहावया
मौजा, ॥ करितसे नारायण नारायणाचि पूजा ॥ ८ ॥
सुरु झालें सहस्रनाम, घालि सुखधाम, भक्त-विश्राम, ओतितसे
पोतीं, ॥ ही खचित नसे मानवी जगीं हो कृती ॥ ९ ॥
राशिमागें राशि पडताती, तुळशिच्या अती, नसे ज्या गणती,
ढीग थोर झाला ॥ समुदाय भक्तांचा थक्क होउनी गेला ॥१०॥
वरि कमळें बहु वर्षती, केतकी किती, पुष्पें भोंवतीं, गणति ना
ज्याला ॥ करि नारायण भक्तांस्तव ऐशा लीला ॥ ११ ॥
नभिं पूर्ण चंद्र उभा[३] असे, मौज पहातसे; म्लान मुख दिसे, भाग्य
ना म्हणुनी ॥ तसे देव[३] विमानीं करिती पुजा पाहोनी ॥ १२ ॥

---

१ पुण्यांतील सनई वाजविणारा महाराजांचा एक भक्त. २ मुंबईतील कोळी ज्ञातीचें भजन. ३ पूजेचे वेळीं पौर्णिमेचा चंद्र वर आकाशांत दिसत होता, त्यावरून पुढील कल्पना.

खरे भाग्यवंत गुरु-भक्त, जगीं या सत्य, चरणिं आसक्त, लाभ
हा त्यांना ॥ जो प्राप्त होय ना ब्रह्मादिक देवांना ॥ १३ ॥

झालि मध्यरात्र आरतिला, ढीग मांडिला कर्पुराचा भला, ज्वाळा
वरि चढती ॥ तैं देव विमानें दूर घेउनी पळती[1] ॥ १४ ॥

घेउनी तीर्थ प्रसाद, गाति गुणवाद निघति नीनाद सद्गुरू धन्य ॥
आम्हि भाग्यवान म्हणुनीच तुम्हां आलों शरण ॥ १५ ॥

हा विष्णुदास मुढमती, वर्णिल किती, परी आहे प्रिती सद्गुरु-
चरणीं ॥ हे कवन नसे त्याचें परि सद्गुरुकरणी ॥ १६ ॥

---

## मनास उपदेश

### " स्मरे बा मना नित्य नारायणाला "

( भु. प्र. )

मना हे भवाचे बहू नष्ट पाश ।
कृपें ज्याचिया पावती पूर्ण नाश ॥
कृपानुग्रहें देत भक्तीसुखाला ।
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ १ ॥

जयाची समस्तांवरी पूर्ण छाया ।
भवाब्धीस दे नाम तारू तराया ॥
पदीं ठेवि जो भाव तो मुक्त झाला ।
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ २ ॥

जयाचेनि नामें जिवां सौख्य होई ।
गुणां वर्णितां मुक्ति घे धांव पायीं ॥

---

१ कापुराच्या ज्वाळा फार उंच जाऊं लागल्या म्हणून पूजा पहाण्यास आलेले देव विमानें घेऊन जाऊं लागलें.

खरे भाग्य जो त्या पदीं नम्र झाला ।
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ ३ ॥

रमानायका सारिखा पूर्ण भोगी ।
उमानायका सारिखा जो विरागी ॥
विधीसारिखा वार्धि धर्मा नितीला ।
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ ४

सदा ज्याचि मेरूपरी वृत्ति शांत ।
ढळेना कळे प्रेममूर्ती नितांत ॥
सृजे क्लेशहारी सदा वाक्सुधेला ।
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ ५ ॥

असो चोर वा जार पापी दुरात्मा ।
पदीं ठाव देई तया जो महात्मा ॥
कृपादृष्टिपातेंचि तारी जनांला ।
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ ६ ॥

जरी स्वात्मआनंद सिंधूंत डोले ।
जनोद्धार-कर्मा सदा यत्न चाले ॥
सदा भक्तिभावाशि जो कां भुकेला ।
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ ७ ॥

असे जो स्वयें सद्गुरूदत्त देव ।
परी भक्ति दत्तात्रयाची सदैव ॥
स्वयें आचरी; दावि तेंची जनांला ।
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ ८ ॥

मना सद्गुरुंच्या पदीं भाव ठेवी ।
जगीं सत्य सेवाच ही आचरावी ॥
मिळे सच्चिदानंद येणें जिवांला ।
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ ९ ॥

मना भावपूजा गुरूंची करावी ।
मनो-बुद्धि-वाचा स्वरूपीं जडावी ॥
नसे अंत कीं पार ऐशा सुखाला ॥
स्मरे बा मना नित्य नारायणाला ॥ १० ॥

---

## श्रीसद्गुरुनाथनारायण महाराज यांचें निवासस्थान

( चा०-चंद्रकान्त राजाची कन्या )

भक्तांसाठीं तो जगजेठी युगायुगीं अवतार धरी ॥
श्रीगुरुदत्तात्रेयनामें अवतरले या कलीपुरीं ॥ ध्रु० ॥
श्रीपाद श्रीवल्लभ नरहरी वासुदेव गुरु अवतरले ॥
नृसिंहसरस्वती जालवणकर नारायण हे अवतार भले ॥ १ ॥
अक्कलकोटीं स्वामि जहाले माणिकप्रभु माणीकपुरीं ।
दत्तात्रय श्रीनारायण तसे अवतरले या बेटपुरीं ॥ २ ॥
जंगलांत या मंगल केलें तुलशीची जैं निपज असे ॥
अतीरम्य मंदीर बांधिलें साम्य त्रिभुवनीं ज्यास नसे ॥ ३ ॥
समदृष्टीनें सकलां बघती दीनावरती थोर कृपा ॥
निजभक्तांचे वालि खरोखर आचरती जे दिव्य तपा ॥ ४ ॥
त्रिकाल चाले पूजा आरती दत्तात्रयगुरुरायाची ॥
संध्यासमयीं आनंद दाटे शोभा जैशी स्वर्गाची ॥ ५ ॥
प्रतिगुरुवारीं पालखि मिरवे भक्त करीती घोषणा ॥
दत्तमंदिरीं गाति नाचति हरिणें करिती प्रदक्षिणा ॥ ६ ॥
ओढा वाहे भोंवतालि जशि चंद्रभागा पंढरपूरीं ॥
किंवा कृष्णा औदुंबरि यमुना जैशी गोकूळपुरीं ॥ ७ ॥
ब्रह्मवृंदा हाची धंदा नैमित्तिक कर्मैं करणें ॥
इतर जनांते जैशी आज्ञा सेवा-धर्मा आचरणें ॥ ८ ॥

२२६५ दो. क्र.

अन्नदानाचें सत्र सदोदित गुर्वाज्ञेवरुनी चाले ॥
द्विशत, पंचशत, सहस्रहि कधिं ते भोजन पावति भक्त भले ९
अखंड चाले घोषनामाचा भक्त गाति प्रेमेंकरुन ॥
श्रीनारायण जय नारायण जयजय नारायण नारायण ॥ १० ॥
प्रतिएक वर्षीं यात्रा भरते; दत्तजयंतीला ॥
भाद्रपद कार्तिक पौर्णिमा तशी दिवाळीला ॥ ११ ॥
चतुर्विध नर शरणचि येती सद्गुरु-चरणांशी ॥
भाव जसा ज्या मनीं वसतसे, फलें त्यास तैशीं ॥ १२ ॥
सद्गुरुमूर्ती जन उद्धारास्तव बेटीं आली ॥
चला भक्त हो शरण जाउं या मागुं कृपा-साऊली ॥ १३ ॥
मूढमती हा विष्णुदास त्या भक्तीचें मुळिं ज्ञान नसे ॥
गुरु-पद-कमळीं लोळण घेणें ठाउक त्यातें हेंच असें ॥ १४ ॥

---

# श्रीनारायणयोगी

## पद ( जयजय दत्तराज योगी )

जयजय नारायण योगी जयजय गुरूराज योगी ॥ ध्रु० ॥
भक्त जनांस्तव स्वामी धरिली तुम्हीं मानव काया ॥
बेटांमाजी वस्ति करोनी भक्ती सुलभ कराया ॥ १ ॥ जयजय ॥
दंडकमंडलु कंथा झोळी त्यजुनी बहु प्रीतीची ॥
राजयोग हा धारण केला आवडीच नामाची ॥ २ ॥ जयजय ॥
अनेकविध भक्तांतें देउनि नानाविध कर्माला ॥
एकविध गुरु-पंथचि केला गाती श्रीनामाला ॥ ३ ॥ जयजय ॥
अमृताचा कुंभ वसतो अमरपुरीं इंद्राशी ॥
नामामृत हें वाहे निरंतर बेटीं श्रीचरणांशी ॥ ४ ॥ जयजय ॥

कलीयुगीं या धर्म लोपला कोठें न मिळे सत्य ॥
दीनदयाघन जडजीवांस्तव अवतरले श्रीदत्त ॥ ५ ॥ जयजय ॥
विष्णुदास तव बालक सद्गुरु भवभय माझें जाळी ॥
अष्ट-भाव-युत भक्ती प्रेमा मागे गुरु-पद-कमळीं ॥ ६ ॥जयजय॥

## करुणा पंचक

( शा. वि. वृत्त )

हे दत्तात्रय अत्रिजा, त्रिगुण मायातीत नारायणा, ॥
भक्तांलागि रुपें अनंत धरिशी; वेदांतही घोषणा, ॥
नाहीं; पार तुझा दयार्णव किती दासीं जरी सोशिला, ॥
यालागीं सदया अनन्यगति मी माथा पदीं ठेविला ॥ १ ॥
माझ्या चंचल मानसा स्थिरपणा द्यावा; कृपें सद्गुरो ॥
जें कीं मानित, आवडीच विषयीं तीतें कदा ना वरो. ॥
झालों, मर्त्य जगांत या करुनियां विषयांचि दुःसंगती ॥
आतां तूं करिशी दया नच जरी माझी पुढें दुर्गती. ॥ २ ॥
सत्यातें त्यजुनी, बळोंचि वरिलें; संसार-दुःखासि या ॥
गेलें; व्यर्थचि आयु आजवरि हें गुंतोनि पाशांत या ॥
होतें, पुण्यचि गांठिला म्हणुनियां हीं पाउलें लाभलीं; ॥
गावो ही मम वाणि तुझिया नामा लिलेला भली ॥ ३ ॥
केला; व्याप करोनि पाप दिधला; जीवां बहू ताप मी ॥
स्वार्थासाठिं खलांशि नम्र बनलों; गर्वें मदाच्या तमीं ॥
होतों; आजवरीच गाढ निजलों स्थीती जशी कां मृता, ॥
सत्संगें घडलेंच दर्शन अतां सेवीन. नामामृता ॥ ४ ॥
नाहीं; आचरलों कदापि सदया सद्भक्ति-पंथाप्रती ॥
होवोनी विषयांध मूढ पर-कांतेची धरी; संगती ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत ११

केले; यत्न बहू परोपरि धनासाठीं छळोनी जनां ॥
नाहीं; एकहि पापि दुष्ट मजसा पापासि ना. तूलना ॥ ५ ॥

## ॥ खरा नातेवाईक ॥

मानवदेह धारण करणाऱ्या जीवांमध्यें, " गोत " या नांवाखालीं पुष्कळशा नातेवाइकांचा भरणा होत असतो. परंतु हें गोत, चौऱ्यायशीं लक्ष योनीच्याच गोत्यांत ढकलून देतें; असा आजपर्यंतचा जगाचा अनुभव आहे.

( फटका )

भल्या मानसा तुझ्या हिताची गोष्ट सांगतो विसरुं नको ॥
सद्गुरुवांचुनि सखा न कोणी चरण तयाचे सोडुं नको ॥ ध्रु० ॥
माता पितरें पालन करिती पुत्रावरती थोर प्रिती ॥
आशा धरिती पोशिल पुढती हेतु हाच कीं त्यां चित्तीं ॥ १ ॥
बहीण भाऊ देतां खाऊ दादावरि करिती माया ॥
स्वार्थ पूर्ण हें प्रेम तयांचे येति न कोणी कामा या ॥ २ ॥
बाइल केली मित्र म्हणोनी मागें लावी ती " आणा "
प्रपंचाचा बैल बनवुनी रात्रंदिन फिरवी घाणा ॥ ३ ॥
सौख्यासाठीं आप्त सोयरे जमती; नातरि गोष्टि नको ॥
सद्गुरुवांचुनि सखा न कोणी चरण तयाचे सोडुं नको ॥ ४ ॥
मामा, काका, बाबा, नाना, दादा, जीजी, तात्याजी ॥
धनसंचय पदरांमधिं तोंवरी सारे करिती हांजीजी ॥ ५ ॥
प्रपंचाचा रिता डेरा घुसळीशी जरि जन्मवरि ।
सत्य सुखाचें नवनित नमिळे; संतांचीही उक्ति खरी ॥ ६ ॥
दांभिक ढोंगी भोंदू कपटी वेषधारि जगिं बहु असती ॥
मोहपाश हा दुस्तर त्यांचा सूज्ञहि कधिं त्यांना फसती ॥ ७ ॥

दत्तात्रय अवतार निश्चितीं श्रीनारायण अवतरले ॥
बेटांमाजी वास जयांचा भक्तां रक्षिती कृपा-बळें ॥ ८ ॥
अनन्यभावें शरण गेलिया कलीभयाचें नांव नको ॥
सद्गुरुवांचुनि सखा न कोणी चरण तयाचे सोडुं नको ॥ ९ ॥

## जिव्हेला उपदेश

राग—यमन ( घटिका गेली पळेंहि गेलीं. )

श्रीनारायण जय नारायण वद वद जिव्हे नाम पावन ॥ ध्रु०॥
पापि अजामिळ पापी कुंटिण ॥ पावन झालीं करितां चिंतन ॥
वाल्या कोळी नाम गाउन ॥ रामाआधि रचि रामायण ॥ १ ॥
नामामृत हें बहुतीं प्राशिलें ॥ थेंब न त्यांतुन कधिंही सरलें ॥
नामचि तारूं भवांबुधिमधें ॥ त्याविण नाहीं आणिक साधन ॥२॥
जगद्गुरु हे श्रीनारायण ॥ नाना लीला भक्तांलागुन ॥
दाविति दासां सौख्यसाधन ॥ विष्णुदास गुरु-पदिं करि वंदन ॥३॥

## नमस्कार पंचक

( शा. वि. वृत्त )

सामर्थ्याविण ज्याचिया नच ढळे उच्छ्वास वा श्वास हा ॥
पावे; तो सविता प्रकाश बरवा ज्याच्या कृपेनें महा ॥
भक्तांतें करुनी सहाय्य पदिं ने मोक्षासि दे; भाविकां ॥
ऐशा श्रीगुरुला अनन्य नमितों. सच्चित्सुखादायका ॥ १ ॥
सम्राटापरि राज्यभोग सुखही देऊं शके; भूपती ॥
नेमें आचरितां व्रतें सुर तसे स्वर्गासही अर्पिती; ॥

दासातें परि देत; जो चिर-सुखा दुर्मीळ, शक्रादिकां ॥
ऐशा श्रीगुरुला अनन्य नमितों. सच्चित्सुखादायका ॥ २ ॥

लोहाचा घडतांच योग परिसा सोनें करी तत्क्षणीं ॥
त्यातें कीं परि शक्य ना; स्वगुण ते देणें तयालागुनी ॥
विश्वासें पद सेवितां, स्व-पदही भक्तांसि जो देत कां ॥
ऐशा श्रीगुरुला अनन्य नमितों. सच्चित्सुखादायका ॥ ३ ॥

ब्रह्मादीक सुरांसुरा किं मनुजा ना आकळे; थोरवी ॥
ज्याच्या ज्ञानदिवाकरा, खचित कीं साम्या लघू, तो रवी ॥
देतां मंत्र मुढांसि मुक्त करि; जो हो पापराशीच कां; ॥
ऐशा श्रीगुरुला अनन्य नमितों. सच्चित्सुखादायका ॥ ४ ॥

रिद्धीसिद्धि जयासि नमिती; दासी जनांचेपरी ॥
भक्तांतें प्रतिपाळि माय जशि कां; जो अन्नदाना करी; ॥
श्रीनारायण नाम घोष करूनी जो सत्पथा दावि कां; ॥
ऐशा श्रीगुरुला अनन्य नमितों. सच्चित्सुखादायका ॥ ५ ॥

---

# हा कुठला न्याय ?

## दोहरा

धन दिया जिस् साहेबनें उसका बने गुलाम ॥
तन दिया जिस् साहेबनें उसको न करे सलाम ॥ १ ॥

पद. ( जयजय दत्तराज योगी )

कहो ये कौन किसीका न्याय ॥ मनुवा न्याय नहीं अन्याय ॥धृ०॥

गर्भपनोंमें हात जुडाकर प्रभुसे बिनती कीनी ॥
बाहिर आय पडा पृथ्वीपर बदल दिई बानी ॥ कहो ये ॥ १ ॥

बच्चापनमें माता प्यारी स्तनमें दूध जमाया ॥ प्रभुनें ॥
मातपिताके प्रीत प्यारमें प्रभुकी याद भुलाया ॥कहोये॥ २ ॥

बालापनमें खेल कमाया तरुनपनोमें नारी ॥
जोरू लडके प्रीत करे सब हरिकी याद बिसारी ॥ कहो ये ॥ ३ ॥
बालबच्चोंके पालनके हित निशिदिन शीस झुकावे ॥ खलको ॥
हरीभजनमें आलस करके क्या क्या ढोंग मचावे ॥ कहो ये ॥ ४ ॥
बुड्ढापनमें चिंता सबकी प्रपंचका सब ध्यान ॥
वात पित्त सब एकहि होकर निकल गया अवसान ॥ कहो ये ॥५॥
स्मशान जाते मुंडि हिलावे लोक कहे श्रीराम ॥
श्रीरामकी बातहि छोडो स्मशानमें बिश्राम ॥ कहो ये ॥ ६ ॥
विष्णुदासके सुंदर मनुवा पल पल जप गुरुनाम ॥
नरकायाका सार्थक यहि है नहिं तो नरकपुरी धाम ॥ कहो ये ॥७॥

---

फाल्गुन वद्य पंचमीचे ( रंगपंचमी ) दिवशीं श्रीसद्गुरुनाथ भक्तजनांना रंग देत असतांना सुचलेले विचारः—

## शके १८५४

### पद ( चा. भगवाझेंडा फडकत )

सद्गुरुदत्त कृष्ण बनला ॥ जनहो रंगपंचमीला ॥ धृ ॥
वेटामाजी फाल्गुन मासीं वद्य पंचमीला ॥
संध्या समयों रंग द्यावया नारायण सजला ॥ जनहो ॥ १ ॥
वेलदोडे आणि खारिक फुलांच्या कंठीं घालुनि माला ॥
शमी तरूच्या फांदी खालीं नारायण बसला ॥ जनहो ॥ २ ॥
करिं पिचकारी घेउनि मारी केशरि रंगाला ॥
धार उडे चहुं फेर जनांवरि हौद असे भरला ॥ जनहो ॥ ३ ॥
रंगाची ही धार कशाची भक्तीचा हा झरा ॥
शरणांगत जो दास तयाला रंगवीतसे पुरा ॥ जनहो ॥ ४ ॥

आनंदाचा रंग मिळे हा बेटीं सकलांला ॥
सूज्ञ अज्ञ जन नाचति रंगुनी पाहुनि गुरुलीला ॥ जनहो ॥५॥
भाग्यवंत जे बेटीं येती ऐशा समयाला ॥
विष्णुदास हा सेवक त्यांचा वंदी पद-रज-धुळिला ॥ जनहो ॥६॥

---

रंगपंचमीचे दिवशीं सद्गुरुंचे हातानें रंगाची धार अंगावर उडत असतां मनांत चाललेले विचार बाहेर प्रगट झाले आहेत.

## शके १८५४

पद ( चा. भान हरी हा मोहि नयनां )

करी दंग मना प्रभु तुमचा हा रंग ॥ ध्रु० ॥
आनंद सागरीं बुडवुनि टाकी ॥
जगतिं करी निस्संग मना ॥ प्रभु० ॥ १ ॥
बहु जन्मींचें पुण्य गांठिला ॥
तरिच घडे सत्संग मना ॥ प्रभु तु० ॥ २ ॥
आशा मनिषा वस्त्रें माझीं ॥
शिकविति नाना ढंग मना ॥ प्रभु तुमचा ॥ ३ ॥
चौंदेहापर रंग उडों द्या ॥
करुनी भव-भय-भंग मना ॥ प्रभु तुम० ॥ ४ ॥
या रंगाची निर्मल धारा ॥
हृदयिं नाचों अभंग मना ॥ प्रभु तुम० ॥ ५ ॥
सकल पंचांची[1] रंगपंचमी ॥
घडो गाण्या श्रीरंग मना ॥ प्रभु तुम० ॥ ६ ॥
भक्ति-रंग हा चित्ति ठसों द्या ॥
विष्णुदास पदीं गुंग मना ॥ प्रभु तुम० ॥ ७ ॥

---

१ पांच पंचकें, अंतःकरण, ज्ञान, प्राण, कर्म व विषय.

# रंग देण्याबद्दल देवाजवळ प्रार्थना

पद ( चा. असाधरिछंद )

असा द्या रंग जेणें होय किं भव-भय-भंग ॥ ध्रु० ॥

रंग चढला द्रौपदिसतिला । दुष्ट नग्न करीती तिजला ॥
वस्त्रें पुरवित ऐन वेळेला । सखा श्रीरंग ॥ जेणें ॥ १ ॥

रंग चढला ध्रुव बाळाला । माता करि लत्ताप्रहराला ॥
वनीं जाउनी तपा बैसला । बांधुनी चंग ॥ जेणें ॥ २ ॥

रंग चढला गोरखनाथा । गुरुजीस्तव भिक्षा आणीतां ॥
डोळा काढुनी देई हाता । भक्तित गुंग ॥ जेणें ॥ ३ ॥

भर्तृहरि रडे पिंगलेसाठीं । रंगाच्या ऐकतांच गोष्टी ॥
रंगुनि परमार्थातें गांठी । झाला निस्संग ॥ जेणें ॥ ४ ॥

किति या रंगानें रंगविले । आत्मानंदीं तल्लिन झाले ॥
विष्णुदास मन चरणि रंगलें । धरि सत्संग ॥ जेणें ॥ ५ ॥

पद ( चा. जमका अजब तडाका बे )

मनुवा भजले गुरु साई माया ठगनी है भाई ॥ ध्रु० ॥

ब्रह्मा फसगये, विष्णू फसगये, फसगये शंकरजी ॥
सद्गुरुजीके दास न फसगये माया उनसे राजी ॥ मनुवा ॥ १ ॥

भोगी फसगये, योगी फसगये, फसगये जपि संन्यासी ॥
सद्गुरुजीके चरण-भक्तिसे माया होगइ दासी ॥ मनुवा ॥ २ ॥

जप नहिं लागे, तप नहिं लागे नालागे कछु ध्यान ॥
देह-भाव सद्गुरु-चरणोंमें, जीव करो कुर्बान ॥ मनुवा ॥ ३ ॥

दत्तात्रय श्रीनारायण गुरु भक्तजनोंके साईं ॥
विष्णुदास है गुलाम उनका ऐसा धनि नहिं कोई ॥ मनुवा ॥४॥

# भिकारी

पद ( जमका अजब तडाका )

भिच्छा डालो जी मैंया मैतो सद्गुरुगुलाम आया ॥ ध्रु० ॥
तीन देहका किया हिंडोला, चौथेकी तो शैय्या ॥
चहुं बाचाकी धूनहि सुनते, सद्गुरु स्वामी सोया ॥ १ ॥ भिच्छा॥
आत्मग्यान-नग सद्गुरु पहिने मै बनुं उनका जूता ॥
भक्ति-पंथपर सद्गुरु चाले, काटत मेरा गोता ॥ २ ॥ भिच्छा ॥
दत्तात्रय श्रीनारायण गुरु, पालक सब दुनियाके ॥
विष्णुदास है गुलाम उनका सेवागुनरस चाखे ॥ ३ ॥ भिच्छा ॥

पद ( चा. तरुण कुलिन गोरा )

चला हो जन बेटपुरीं जाऊं ॥ दत्तात्रय श्रीनारायण गुरू
डोळे भरुनि पाहूं ॥ ध्रु० ॥
जेथ वाहे विमल भक्तिचा निरंतर झरा ॥
सांपडे मोक्षाची वाट अचुक जैं नरा ॥
पावेल नाश संसार-ताप जैं पुरा ॥
गुरु-चरणां सेवूं ॥ आनंदें गुरुचरणां सेवूं ॥
ब्रह्मानंदीं तल्लिन होउनी सद्गुरुस्तुति गाऊं ॥ चला० ॥१॥
होतील भेटि गुरु-भक्तांच्या संतांच्या ॥
मिळतील ऐकण्या गोष्टी गुरुलीलेच्या ॥
होतील भस्म तैं राशी जरि पापाच्या ॥
भजनामृत सेवूं ॥ आनंदें भजनामृत सेवूं ॥
गुरु-प्रसादें नामभक्तिनें जन्मदुःख मिटवूं ॥ चला० ॥२॥
जमताति नानाविध बेटीं नारी नर ॥
परमार्थि दुःखि लोभि ज्ञानी नरवर ॥

पावती फलें दाविती जसें अंतर ॥
नामध्वजा लावूं ॥ गुरूची नामध्वजा लावूं ॥
विष्णुदास म्हणे अमरानां जें दुर्लभ यश मिळवूं ॥ चला० ॥ ३ ॥

पद ( चा.–स्वामिदत्तात्रया दिगंबरा )

स्वामि नारायणा नारायणा । दीनावरी करि करुणा ॥ ध्रु० ॥
झालों संसारिं हमाल, केलि पापाचि कमाल ॥
विसरलों गुरु तव चरणां ॥ स्वामिना ॥ १ ॥
लोळे विषयगतीं, बहु कुटुंबिं प्रिती ॥
जसा बैल फिरवीतो घाणा ॥ स्वामि ॥ २ ॥
दास धरी पायां, करि कृपेचि छाया ॥
आलों शरण कली–भय–हरणा ॥ स्वामिना ॥ ३ ॥

पद ( चा. साध्य नसे मुनिकन्या )

या मम चित्ता स्थिरता । द्यावी आतां श्रीगुरुनाथा ॥ ध्रु० ॥ लटकी माया वेष्टुनी शरिरा । निशिदिनिं वाहे चिंता ॥ पशुसम श्रमुनी वय हें सरलें । शांति सुखाची न वार्ता ॥ या मम चित्ता ॥१॥ तवमूर्तीचें ध्यान धरीतां । क्षणहि न त्यासी स्थिरता । नाना वस्तू अंतरि दावी । नयनहि मिटले असतां ॥ या मम चित्ता ॥२॥ विषयासक्ती जाळुनियां मम । भजनीं राहो दृढता । दास तुझा कर-जोडुनि विनवी । चरणीं ठेविन माथा ॥ या मम चित्ता ॥ ३ ॥

---

# आमचा गोकुळांतील कृष्ण

( चाः-उद्धवा शांतवन )

गुरु-भक्त देत ही ग्वाही ॥ तें सौख्य आज मुळिं नाहीं ॥ ध्रु० ॥

होऊंद्या थोर नगर नामाचा कीं बाजार ॥
होउंद्या सडक सुंदर वहानांची येरझार ॥
होउंद्या मंदिरें मोठी यात्रेची तैशी दाटी ॥
पाहून अशा शोभेला ॥
आनंद मुळीं नच मजला ॥
तें रमवी नच चित्ताला ॥
मज स्मृती पूर्विची होई ॥ तें सौख्य आज मुळिं नाहीं ॥ १ ॥

तुम्हि म्हणा बेट वैकुंठ कैलासाचें कीं पीठ ॥
वा नांवजाच सुखधाम भक्तांचा तो विश्राम ॥
तें म्हणा नामि शहर अथवा तें पंढरपूर ॥
तें चित्ता मम ओढीना ॥
त्या शोभेची गोडीना ॥
पूर्वींची करितां तुलना ॥
तो काळ सुखाचा बाई ॥ तें सौख्य आज मुळिं नाहीं ॥ २ ॥

आरुढली स्वारी प्रभुची सिंहासनिं जरि चांदीच्या ॥
मज मोद मुळीं ना पडल्या राशी जरि त्या रत्नांच्या ॥
वर्षल्या जरी बेटांत घनधारा त्या मोत्यांच्या ॥
आश्चर्य तयाचें मजला ॥
ना मुळीं कधीं तुम्हांला ॥
ती बालपणींची लीला ॥
मम चक्षुंपुढें उभि राही ॥ तें सौख्य आज मुळिं नाहीं ॥ ३ ॥

सांवळी मूर्ति बहु छोटी लाउनी कटी लंगोटी ॥
दावीत बाललीलेला सांगुनियां सुंदर गोष्टी ॥
बोबड्या बोलुनी बोला मम हृदय-धनातें लूटी ॥
जरि दाणा शिल्लक नसला ॥
करि तयार सामुग्रीला ॥
स्वकरें वाढी आम्हांला ॥
दे स्वाद अमृताहुनिही ॥ तें सौख्य आज मुळिं नाहीं ॥ ४ ॥

तें जंगल कांटेरान श्वापदें फिरति तैं नाना ॥
वाहनाशि नाहीं वाट पथिं होय चालतां दैना ॥
जरि बैलगाडि मीळाली हाडांचा करि ती फन्ना ॥
झोंपडी तीन काठ्यांची ॥
गादी बसण्या कांबळिची ॥
वरि छाया ती धाब्याची ॥
परि स्वर्ग–सूख तैं होई ॥ तें सौख्य आज मुळिं नाहीं ॥ ५ ॥

श्रीकृष्ण द्वारकाधीश सोन्याची रचि द्वारका ॥
तैं रत्न जडित प्रासाद त्या पाचूंचें द्वार का ॥
माणीक हिरे मोत्यांच्या नभिं जलांत झुलती नौका ॥
परि पाहुनियां हे चाळे ॥
गोपींचें मन कंटाळे ॥
गोकुळींचें स्मरती चाळे ॥
श्रीकृष्ण गोकुळीं बाई ॥ तें सौख्य आज मुळिं नाहीं ॥ ६ ॥

( सोमवार ता. २६-१२-३२ रोजीं श्रीगुरुभक्त अंजनीताईसाहेब यांच्या संभाषणांत श्रवण केलेल्या गोष्टींचा सारांश वरील पद्यांत गोंवण्याचा प्रयत्न केला आहे. )

---

२२८

# प्रार्थना.

पद ( भैरवी )

श्रीगुरुनाथ सद्गुरुनाथ मी अपराधी घ्या पदरांत ॥
सुमती द्या सेवा घ्या कलि-भय न्या आदीनाथ ॥ ध्रु० ॥
जन्मोजन्मीं प्रपंच केला, पापाचा बहु संचय झाला, ॥
दुःखभोग हा नाहीं सरला, आलों शरण तुला ॥ १ ॥
नर-जन्मामधिं येउनि राया, श्रमलों आतां बहुसुख द्याया ॥
भक्ति नाहीं घडली क्षणभरि गेलें वय वाया ॥ २ ॥
षड्रिपुंचा मी गुलाम बनलों, कुटुंबपाशीं बद्ध जहालों ॥
नरक वास हा सौख्य-द मानुनी भजन-सुखा भुललों ॥ ३ ॥
धांव पाव श्रीसद्गुरुमाये, संसाराचें दुःख न साहे ॥
पतीतपावन ब्रीद राखुनी धांवत येये ये ॥ ४ ॥
श्रीनारायण सद्गुरुआई, त्रिविध ताप हा विलया नेई ॥
विष्णुदास पदिं करी प्रार्थना भजनसुखा देई ॥ ५ ॥

---

# विनंती.

अभंग

हीच पायांशीं विनंती । देवा राहे माझे चित्तीं ॥
मुखिं तुझें मंगलनाम । देइं अखंडित प्रेम ॥
नको द्रव्याची आसक्ती । सदा घडो तुझी भक्ती ॥
विष्णुदास लोटांगणी । लागे संतांचे चरणीं ॥ ४ ॥

---

# बेटांतील नित्य नियमाच्या प्रार्थना व आरत्या

## आरती

सगुण ही आरती निर्गुण ओवाळूं । सगुण ओवाळूं । कल्पनेचें घृत घालुनी दीप पाजळूं । ओवाळूं आरती सद्गुरुनाथा । माझ्या नारायणनाथा । भावें चरणकमलावरी ठेविला माथा ॥ १ ॥

अविद्येचा मोह परता उपडोनि सांडूं । आशा मनशा तृष्णा काम क्रोध कुर्वंडूं ॥ ओ० ॥२॥ सद्गुरूचें पूजन केलें षोडशोपचारीं ॥ रामानंद जीवन्मुक्त झाला संसारीं ॥ ३ ॥

## अप्रसिद्ध परंतु पूर्वी प्रचारांत असलेली आरती

शांत दयानिधे सद्गुरुनाथा । माझ्या नारायणनाथा । श्रीपदिं अर्पी सेवारती स्वीकारी आतां ॥ धृ० ॥ काम क्रोध लोभ मोह माया जाळूनी । घेई नीरांजन दानीं । काळ लागला पाठिस जाणुनी आलों तव चरणीं ॥ शांत ॥ १ ॥

स्थीर नोहे अंतःकरण ध्यानीं पूजनीं । देवा ध्यानीं पूजनीं । षड्‌-वैरी हे निमिषत् चित्ता नेती ओढोनी ॥ शांत ॥ २ ॥

वदनीं दे तव नामस्मरण भवसंकटहरणा । योगी श्रीनारायणा ॥ विद्यानंदा अविद्या छेदुनी उद्धरी चरणां ॥ शांत ॥ ३ ॥

टीपः—ही आरती श्रीगुरुभक्त अंजनीताईसाहेब यांनीं म्हणून दाखविली होती.

## आरती

आरति नारायण गुरुची । आरति नारायण प्रभुची ॥ सुमंगल धवल सद्यशाची ॥ धृ० ॥ सच्चिदानंद मूर्ति बरवी । दर्शनें त्रिविध ताप हरवी । विपत्ती दैन्य दोष नुरवी । दिनावरी दया

क्षमा मिरवी ॥ चा. ॥ गर्जना दत्त दत्त करुनी । प्रगट करि चरित । दावुनी प्रचित । भाविकां देत । साक्ष गुरुची । महिमा तीर्थ-प्रसादाची ॥ १ ॥ आरति ॥

बालतनु ज्ञानदेह मूर्ती । अघटित तेहि घडुनि आणिती । हर्ष भयशोकरहित चित्तीं । रंगली निजानंदिं वृत्ती ॥ चा. ॥ कृपेनें वारि आधिव्याधी । नमितां चरण । शरण जन तराति । हरि-तसे ताप । बाप हा माय बहिण अमुची । ओळली माय भाविकांची ॥ २ ॥

भजनीं प्रेमभरें डुलती । मुखानें दत्त दत्त म्हणती । त्रिविध जन बोधुनि हित करिती । पावन अघहर भागिरथी ॥ चा. ॥ आर्यजन जननी प्रगट झाली । परम उग्र कलीं । सुनिर्मल अति जाळित निशिदिनीं करुणाघनही । वृष्टि करित आलि माय बाळकांची । धांवली माय बाळकांची ॥ ३ ॥

नारायणा दत्तराया । परिसा माझि विनति सदया । करुनियां कृपेची छाया । निवारा संसृति ही माया ॥ चा. ॥ कोणि मज नाहिं तुम्हांविण हो । सदानंदधाम । गोड तव नाम । देइ मज प्रेम । माय तूं नारायण अमुची । राखि मम लाज बाळकाची ॥ ४ ॥ आरति.

## पुष्पांजली

पुष्पांजलि ही तुम्हां अर्पितों नारायण सदया । तवपदिं वंदन करण्या स्फुर्ति द्यावी या हृदया । पुष्पांजलि ॥ध्रु०॥ भाविक जन हे आनंदानें नमिती तव पायीं । धन्य मानिती ते अपुल्याला संशय मुळिं नाहीं ॥ पुष्पांजलि ॥ १ ॥ दत्तगुरू नारायण स्वरूपीं अव-तरले जगिं या । उद्धरण्याला भक्तजनांला हरूनी पाप भया ॥ पुष्पांजलि ॥ २ ॥ दीनदयाळा आम्हीं लेकुरें शरण तुम्हां आलों । भक्तीप्रेमें पुष्पांजलि ही वहाण्याला सजलों ॥ पुष्पांजलि ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २२६९

## प्रार्थना

झडकरी पदरीं घ्या । हरि माया । नत काया । गुरुराया या या । झडकरी० ॥धृ०॥ अनेक जन्मीं दुष्कृत केलें दुर्बुद्धितें वरिलें। म्हणोनि माझें आजवरी तें व्यर्थचि आयुष्य गेलें । परंतु किंचित् सुकृत होतें दर्शन अपुलें झालें ॥ अज्ञुनीया । गुरु सदया । करि माया । सुख व्हाया । दासा या या । झड० ॥ १ ॥ मायापाशें बद्ध होउनि लक्षांशातें चुकलों ॥ षड्रिपु मातें ओढिति नरकीं सुखद तनूला मुकलों । प्रेम वासना भक्ति श्रद्धा यातें मुळिं अंतरलों । गुरु आई । करि घाई । वर घेई । भव डोहीं ॥ जातों नरकीं या या । झड० ॥ २ ॥ पूर्ण ब्रह्म स्वयंप्रकाश दिससी नारायण मम नयनां । दुष्ट वासना नावरती या प्रयत्न केले नाना । विष्णुदास हा भावचि ठेउनि नम्र असे या चरणां ॥ गुरुदत्ता । मम चित्ता । वरि आतां । गुरु सत्ता । दावी नयनां या या । झड० ॥ ३ ॥

ॐ अनंत कोटी ब्रह्मांड नायक राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ नारायण महाराजकी जय.

॥ सच्चिदानंद श्रीसद्गुरु नारायणार्पणमस्तु ॥

REFBK-0000226
REFBK-0000226

समाप्त